## "सफाईगार" पदाकरीता भर्ती प्रक्रिया – २०२५

जिल्हा न्यायालय, चंद्रपूर यांचे आस्थापनेवरील 'सफाईगार' या पदासाठी उमेदवारांची निवड यादी आणि प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या तारखेस पात्रता निकष पुर्ण करणा–या पात्र उमेदवारांकडून खालीलप्रमाणे ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | तपशिल | सफाईगार |
|---|---|---|
| १ | निवड यादी | ०४ |
| २ | प्रतिक्षा यादी | ०१ |
| ३ | वेतनश्रेणी | वेतन स्तर एस–१: (१५०००–४७६००) |

इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्ज जाहिरातीच्या खंड 'क' मध्ये नमुद केलेल्या आवश्यक डिमांड ड्राफ्ट **(Demand Draft)** सह परिशिष्ट–अ मधील नमुन्यानुसार, **दिनांक १०/०६/२०२५ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी पोहचतील या बेताने **प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, (न्यायमंदिर), बस स्टँड समोर, चंद्रपूर – ४४२ ४०१** या पत्यावर फक्त **शीघ्र टपालाद्वारे (Speed Post)** पाठवावेत. उपरोक्त अर्ज समाविष्ट असलेल्या लिफाफ्यावर **"सफाईगार पदासाठी अर्ज"** असे स्पष्टपणे लिहीणे आवश्यक आहे.

अर्ज साध्या पोस्ट व्दारे/कुरीयर व्दारे/किंवा हस्ते (By hand) स्वीकारल्या जाणार नाहीत. तसेच वरील नमूद केलेल्या दिनांकानंतर मिळालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही..

सदर प्रक्रिये दरम्यान घेतल्या जाणाऱ्या स्वच्छता आणि चापल्यता चाचणी आणि मुलाखतीसाठी उमेदवारास स्वखर्चाने हजर रहावे लागेल. नियुक्ती व अल्पसुचीचे (Shortlisting) सर्व अधिकार **निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर** यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

**सफाईगार हे एकाकी पद (Isloated Post) असून, सदर पदास भविष्यात पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत यांची उमेदवाराने नोंद घ्यावी.**

अ) पात्रता

१. उमेदवार भारताचा नागरिक असावा.

२. शैक्षणिक अर्हता :—

- उमेदवार किमान ७ वी (सातवी) इयत्ता उत्तीर्ण असावा.
- उमेदवाराची शरीरयष्टी सुदृढ असावी, जेणेकरून त्यापदावरील कर्तव्य तो पार पाडु शकेल.
- उमेदवारास मराठी व हिंदी भाषा लिहिता,वाचता व बोलता येणे आवश्यक आहे.

३. अनुभव :—

- उमेदवारास शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच शासकिय कार्यालय अथवा न्यायालयात पूर्वी काम केल्याचा अनुभव असल्यास त्या उमेदवारास प्राधान्य दिल्या जाईल.

४. वयोमर्यादा :—

| प्रवर्ग | किमान वयोमर्यादा | क्माल वयोमर्यादा |
|---|---|---|
| खुला | १८ वर्षे | ३८ वर्षे |
| मागासवर्ग (अ.जा/अ.ज.,इ.मा.व.,वि.जा./भ.ज.,वि.मा.प्र.ईत्यादी) | १८ वर्षे | ४३ वर्षे |
| योग्य मार्गाने अर्ज करणा—या राज्य/केंन्द्र सरकारी कर्मचा—यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा लागू राहणार नाही. (कंत्राटी कामगार वगळता) | १८ वर्षे | लागू नाही |

ब) पात्र उमेदवारांच्या अटी

१) उमेदवाराचे चारित्र्य आणि वर्तणूक चांगली असावी.

२) उमेदवार करार करण्यास सक्षम असावा.

३) उमेदवारास कोणतेही न्यायालय/एम.पी.एस.सी/यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य सेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा निवडींमध्ये उपस्थित राहण्यापासून कायमचे काढून टाकलेले नसावे किंवा अपात्र ठरवलेले नसावे.

४) उमेदवारास नैतिक अध:पतनाच्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवण्यात आलेले नसावे किंवा त्यास फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवलेले नसावे किंवा उमेदवारा विरूद्ध फौजदारी खटला प्रलंबित नसावा.

५) उमेदवारास हयात असलेल्या पत्नी/पती ची संख्या एकापेक्षा जास्त नसावी.

६) महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ नुसार, उमेदवारास अर्ज करण्याच्या दिनांकास २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे, हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक नसावी.

## क) अर्ज भरण्याचे शुल्क

१) सदर भरती प्रक्रियेसाठी अर्ज शुल्क **रूपये ३००/– (रूपये तीनशे मात्र) (सर्व प्रवर्गासाठी)** एवढे असेल.

२) अर्ज शुल्क हे "**DISTRICT JUDGE-1 AND ADDITIONAL SESSIONS JUDGE, CHANDRAPUR**" यांच्या नावे काढलेला रूपये ३००/– (रूपये तीनशे मात्र) चा डिमांड ड्राफ्ट (Demand Draft) च्या स्वरूपात सादर करावे.

३) अर्ज शुल्क भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४) अर्ज शुल्क ना–परतावा (non-refundable) असेल.

## ड) निवड प्रक्रिया

**आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर अल्प सूची (short list) प्रमाणे पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.**

| अ.क्र | मुल्यांकन पध्दती | एकूण गुण | किमान पात्रता गुण |
|---|---|---|---|
| १ | स्वच्छता आणि चापल्यता चाचणी | ३० | १५ |
| २ | वैयक्तिक मुलाखत (Interview) | २० | १० |
| | **निवड प्रक्रियेचे एकूण गुण** | **५०** | **२५** |

सूचना :

| | |
|---|---|
| १ | स्वच्छता आणि चापल्यता चाचणीमध्ये मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे, काटेकोरपणे गुणवत्तेच्या आधारे जाहीरातीमध्ये नमूद केलेल्या पदांच्या संख्येच्या ०३ पट उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. १:३ हे गुणोत्तर राखण्यासाठी संक्षिप्त यादी केलेल्या शेवटच्या उमेदवाराने मिळवलेल्या गुणांइतकेच गुण मिळवणारे एकापेक्षा जास्त उमेदवार असतील तर अश्या सर्व उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलावले जाईल. |
| २ | वरील सर्व परीक्षांसाठीचे वेळापत्रक व निकाल जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर च्या अधिकृत संकेतस्थळावर व सुचना फलकावर वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येईल. त्यामुळे अर्ज भरल्यानंतर उमेदवारांनी नियमितपणे अधिकृत संकेतस्थळाला भेट देत राहावे. |

इ) उमेदवाराने अर्जासोबत डिमांड ड्राफ्ट **(Demand Draft)** वगळता कोणतेही कागदपत्रे जोडू नयेत.

ई) जे उमेदवार वैयक्तिक मुलाखतीसाठी पात्र ठरतील त्यांनी वैयक्तिक मुलाखतीसाठी येतांना खालील कागदपत्रांच्या स्वत: प्रमाणित **(Self-attested)** केलेल्या छायांकित प्रती सादर कराव्यात. तसेच सोबत मुळ प्रती तपासणीसाठी आणाव्यात.

१) जन्मतारखेच्या पुराव्याचा दाखला (शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/सक्षम प्राधिकरणाने निर्गमीत केलेले जन्म प्रमाणपत्र/ एस.एस.ची. चे बोर्ड प्रमाणपत्र (School Leaving Certificate/Birth Certificate issued by Competent Authority/Board Certificate of SSC).

२) शैक्षणिक पात्रतेच्या परीक्षेचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र (७वी, १०वी, १२वी किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त विद्यापीठातून घेतलेली पदवी, इत्यादी)

३) सफाईगार पदासाठी इयत्ता ७ वी मधील गुण नमूद करणे अनिवार्य असेल. जर उमेदवार इयत्ता ७ वी ची परिक्षा उत्तीर्ण असेल आणि पुढील उच्च अर्हता प्राप्त उदा. १० वी किंवा १२ वी असेल व उमेदवाराकडे इयत्ता ७वी चे गुणपत्रक नसेल तर उमेदवाराने अर्ज भरतांना इयत्ता ७वी करीता काल्पनिकरीत्या ५०% गुणांची (उदा. एकूण १०० पैकी ५० गुण प्राप्त) नोंद अर्जामध्ये शैक्षणिक अर्हता रकान्यात करावी.

४) उमेदवाराने त्याच्या शैक्षणिक कागदपत्रांच्या आधारे अर्ज सादर करण्याच्या दिवशी धारण करीत असलेली अचूक शैक्षणिक पात्रतेबाबतची माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेबाबत माहिती भरताना उमेदवाराने पात्रता खाली दिलेल्या क्रमानुसार नमूद करावी.

१) ७ वी
२) एस. एस. सी (S.S.C)
३) एच. एस. एस. सी. (H.S.S.C) किंवा कोणत्याही मान्यता प्राप्त बोर्ड किंवा विद्यापीठातून प्राप्त केलेली पदवी.
४) अर्ज दाखल करतेवेळी उमेदवार धारण करीत असलेली उच्च शैक्षणीक पात्रता नमूद करणे बंधनकारक राहील.

५) शौचालय व स्नानगृह स्वच्छतेचा, झाडू कामाचा तसेच कार्यालय परिसर स्वच्छतेचा पूर्वानुभव असल्यास त्या संबंधीचा दाखला.

६) जाहिरात प्रसिद्धी नंतरची तारीख असलेले दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेले चारित्र्य संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्र. (त्यांचा पत्ता व फोन नंबर सह) (परिशिष्ट 'ब')

७) लहान कुटुंबाबाबत स्वयं घोषणापत्र (Self Declaration) (परिशिष्ट 'क').

८) सक्षम अधिका—यांने प्रदान केलेला जातीचा दाखला. (केवळ मागासवर्गीयांसाठी)

९) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certifcate)

१०) सेवायोजन कार्यालयात नोंदणी केलेली असल्यास, नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

११) उमेदवार शासकीय कर्मचारी असल्यास, त्याच्या कार्यालयाचे ना—हरकत प्रमाणपत्र.

१२) विवाहीत महिला उमेदवारांच्या बाबतीत, जर तिने लग्नानंतर तिचे नाव बदललेले असेल तर तिच्या नावाच्या बदलाबाबत दस्तऐवज, उदाहरणार्थ शासकीय राजपत्र, सक्षम प्राधिकरणाने जारी केलेल्या विवाह प्रमाणपत्राची प्रत, इत्यादी.

१३) संबंधीत इतर आवश्यक कागदपत्रे अर्जामध्ये दिलेल्या माहितीसह.

१४) न्यायालय प्रशासनाने मागणी केल्यास इतर कोणतेही दस्ताऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

१५) आधार कार्ड.

## फ) उमेदवारांकरीता अतिरीक्त सूचना

१) अर्ज विहित नमुन्यातच सादर करावा. (जाहिरातीसोबत दिलेल्या परिशिष्ट 'अ' नमुन्यात)

२) अर्जातील संपूर्ण माहिती अचूक भरणे उमेदवारास बंधनकारक आहे.

३) उमेदवाराने अर्ज भरताना संपूर्ण नाव, पत्ता, मोबाईल नंबर, ई–मेल आयडी, जन्म तारीख त्यांच्याजवळ उपलब्ध असलेल्या वैध कागदपत्रानुसार अचूक रित्या नमूद करावे.

४) उमेदवाराविरूद्ध फौजदारी गुन्हा दाखल झाला असल्यास किंवा पूर्वी एखाद्या प्रकरणात फौजदारी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास त्याबाबत सविस्तर माहिती दयावी. तसेच उमेदवार सध्या नोकरीत असल्यास, निलंबीत असल्यास किंवा त्याच्यावर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित असल्यास, तसे अर्जात नमूद करावे.

५) उमेदवाराने डिमांड ड्राफ्ट नंबर आणि त्याचा दिनांक अर्जात नमूद करावा. सदरहु मुळ (Original) डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडावे.

६) उमेदवाराने एकापेक्षा जास्त अर्ज सादर केल्यास शुल्कासह उमेदवाराचा शेवटचा अर्ज विचारात घेतला जाईल.

७) उमेदवाराने जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे पात्रता आणि निकष पूर्ण केले असतील तरच अर्ज स्वीकारला जाईल.

८) सदरहू पदे जशी–जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

९) उमेदवाराने अर्जाचा नमुना जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूरच्या संकेतस्थळावरून डाऊनलोड करून घेवून केवळ ए–४ आकाराच्या चांगल्या दर्जाच्या कागदावर सुस्पष्टपणे टंकलिखित अगर संगणकीकृत टायपींग केलेले असावेत.

१०) उमेदवाराने अर्जा मधील फोटोच्या रकान्यामध्ये स्वत:चे नविनतम पासपोर्ट आकाराचे छायाचित्र चिटकवावे. स्वाक्षरीची सुरूवात सदर छायाचित्रावर करून काही भाग छायाचित्राबाहेर येईल अशाप्रकारे बॉलपेनने स्वाक्षरी करावी.

११) उमेदवार जर शासकीय सेवेत असेल तर त्यांचा उमेदवारीचा विचार होण्यास विभागास कोणतीही हरकत नाही असे विभागप्रमुख/कार्यालय प्रमुख यांचे कडून ''नाहरकत प्रमाणपत्र'' घ्यावे. त्यानंतर मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांनी, मुलाखतीच्या वेळेस हे मुळ प्रमाणपत्र सादर करावे. परंतु, उमेदवाराने आपला अर्ज विभागप्रमुख किंवा कार्यालयप्रमुख यांचे मार्फत पाठविण्याची आवश्यकता नाही.

१२) अपूर्ण अर्ज किंवा असा अर्ज जो उमेदवाराने सादर केलेल्या तपशिलामुळे त्यास पदासाठी अपात्र ठरविल असा अर्ज बाद ठरविला जाईल आणि त्याबाबत कोणतीही तक्रार किंवा उजर ऐकला जाणार नाही.

## ग) उमेदवारांकरीता इतर आवश्यक सूचना :–

१) जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवाराची शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्ता तसेच स्वच्छतेचा पुरेसा अनुभवानुसार अल्पसूची करण्याचे सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत.

२) भरती प्रक्रिया कोणत्याही वैध कारणामुळे रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा करता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार निवड समिती, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांनी स्वत:कडे राखून ठेवले आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा अथवा तक्रार करता येणार नाही.

३) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास उमेदवाराची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल अथवा नियुक्त झाल्यास उमेदवारास पदावरून कोणतीही पूर्व सूचना न देता काढून टाकण्यात येईल.

४) अल्पसुचित समाविष्ट उमेदवार जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला स्वच्छता आणि चापल्यता चाचणीकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. मुलाखती/नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

५) केवळ अर्ज दाखल केला यावरून मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही. तसेच उमेदवाराची उच्च शैक्षणिक पात्रता हाच सदर पदाच्या निवडीसाठी मुख्य आधार मानला जाणार नाही.

६) जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांचे नियंत्रणाबाहेरील कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे भरती प्रक्रियेचे वेळापत्रक बदलू शकते. असा बदल वेळोवेळी जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर यांच्या अधिकृत संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर प्रसिद्ध केला जाईल. त्याकरिता उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी.

७) उमेदवाराला कोणत्याही बदलाबाबतची सूचना उशीरा मिळाल्यामुळे नियोजित तारखेस व वेळेस स्वच्छता आणि चापल्यता चाचणी व मुलाखतीस उमेदवार अनुपस्थित राहिल्यास, जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर प्रशासनाकडून या बाबत कोणतीही तक्रार/दावा विचारात घेतला जाणार नाही. किंवा ऐकला जाणार नाही.

८) उमेदवाराने सफाई कामाची स्वच्छता आणि चापल्यता चाचणी मध्ये मिळविलेल्या गुणांच्या आधारे तसेच त्याच्या अर्जाची छाननी व त्याने मुलाखतीच्या वेळेस सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उमेदवाराची मुलाखतीची पात्रता अंतिमरित्या ठरविण्यात येईल.

९) पात्र उमेदवारांना स्वच्छता आणि चापल्यता चाचणी तसेच वैयक्तिक मुलाखतीसाठी नियोजित तारखांना स्व: खर्चाने हजर रहावे लागेल.

१०) स्वच्छता आणि चापल्यता चाचणी तसेच वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलावण्यात येणा–या उमेदवारांनी स्वत:चे मूळ ओळखपत्र उदा:– मतदार कार्ड, पॅन कार्ड, आधार कार्ड, वाहन परवाना यापैकी कोणताही एक पुरावा आणावा.

११) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर येथे काम करणा–या अधिका–यांना, कर्मचा–यांना भेटण्याचा किंवा त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीश: अथवा इतर कोणामार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास उमेदवारास निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व त्यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१२) निवड यादीतील उमेदवार नियुक्ती आदेशात नमूद केलेल्या कालावधीत कर्तव्यात सामील होऊ शकला नाही तर उमेदवाराचे नाव निवड यादीतून काढून टाकले जाईल. प्रतिक्षा यादी ही केवळ निवड यादीतून उमेदवार पदावर रूजू होण्यासाठी दिलेल्या विहित मुदतीत रूजू न झाल्यामुळे रिक्त झालेल्या किंवा निवड यादीतील उमेदवार पदावर रूजू झाल्यास परंतु उमेदवाराने निवड यादीच्या वैधता कालावधीत राजीनामा दिल्यास अगर अन्य कोणत्याही कारणांमुळे निवड यादीतील निवड झालेल्या उमेदवाराचे पद रिक्त झाल्यास वापरात येईल.

१३) निवड यादीतील उमेदवारांची नियुक्ती सुरूवातीला परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल. परिविक्षाधीन कालावधी समाधानकारक पूर्ण झाल्याबद्दल प्रमाणपत्र जारी होईपर्यंत नियुक्तीच्या सेवा कोणत्याही वेळी, कोणतीही नोटीस न देता किंवा कोणतेही कारण न देता समाप्त केल्या जातील.

१४) निवडसुची व प्रतिक्षा सुची ही मा. उच्च न्यायालयाच्या मान्यतेस अधीन राहून, दोन वर्षाच्या कालावधीकरीता अथवा मा. उच्च न्यायालय विहीत करेल अशा कालावधीसाठी वैध राहील. त्यानंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी मुदतवाढ न दिल्यास ही यादी व्यपगत होईल.

१५) निवड झालेल्या उमेदवारांची सेवा ही मा. उच्च न्यायालय व महाराष्ट्र शासनाद्वारे वेळोवेळी तयार करण्यात आलेल्या नियमांप्रमाणे असेल.

१६) उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमांनुसार अंशदान निवृत्ती वेतन योजना व शासकीय नोकरीच्या प्रयोजनार्थ गठीत सर्व अटी व शर्ती लागु राहतील.

१७) उमेदवारांची सेवा त्यांच्याबाबत संबंधीत पोलीस अधिक्षक/पोलीस आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त करून घेतल्या जाणा–या चारीत्र्य पडताळणी प्रमाणपत्रास अधिन राहून असेल.

१८) या निवड प्रक्रियेत निवड समितीने घेतलेला निर्णय हा अंतिम असेल.

आदेशावरून

प्र. प्रबंधक

जिल्हा व सत्र न्यायालय,

चंद्रपूर

दिनांक : २३-०५-२०२५

# परिशिष्ट 'अ'
## जिल्हा व सत्र न्यायालय, चंद्रपूर

प्रति,
माननीय प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
चंद्रपूर

अर्जदाराचा फोटो

विषय :– "सफाईगार पदासाठी अर्ज".

**माननीय महोदय,**

विनंतीपूर्वक अर्ज सादर करतो की, मी **'सफाईगार'** या पदावर आपल्या कार्यालयात काम करण्यास इच्छुक असून माझी तपशीलवार माहिती खालीलप्रमाणे देत आहे.

(आवश्यक त्या ठिकाणी √ करावे.)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | **उमेदवाराचे संपूर्ण नाव** | आडनाव | नाव | वडिल / पतीचे नाव |
| २ | **पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सह)** | | | |
| ३ | **राष्ट्रीयत्व (Nationality)** | | | |
| ४ | **उमेदवार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय?** | होय / नाही | | |
| ५ | **दूरध्वनी / मोबाईल क्रमांक** | | | |
| ६ | **ई–मेल आयडी** | | | |
| ७ | **लिंग** | | | |
| ८ | **धर्म** | | | |
| ९ | **ज़ात व प्रवर्ग** | | | |
| १० | **जन्म दिनांक** | | | |

| | | |
|---|---|---|
| ११ | जहिरात प्रसिध्दीच्या तारखेस उमेदवाराचे वय | ..........वर्षे..........महिने..................दिवस |
| १२ | उमेदवाराची वैवाहिक स्थिती (अविवाहित / विवाहीत / घटस्फोटित / विधवा / विधुर) | |
| १३ | हयात असलेल्या मुलांची संख्या | |
| १४ | २८/०३/२००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या (असल्यास जन्मदिनांक नमूद करावा) | |
| १५ | उमेदवार दिव्यांग आहे काय? | होय / नाही |

१६. शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र | शैक्षणिक अर्हता | परीक्षा मंडळाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | एकूण गुण | प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१७. सफाई कामाचा अनुभव :

| अ.क्र | अनुभव (संबंधित कार्यालयाचे नाव व पत्ता) | कालावधी | | एकूण (वर्ष, महिने व दिवस) |
|---|---|---|---|---|
| | | दिनांकापासून | दिनांकापर्यंत | |
| | | | | |
| | | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | इतर विशेष/अर्हता | | | |
| १९ | ज्ञात भाषा | | | |
| २० | शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास : | | | |
| | अ) कार्यालयाचे नाव | | | |
| | ब) धारण केलेले पद | | | |
| | क) नियुक्ती दिनांक | | | |
| | ड) अर्ज करताना सदर कार्यालयाद्वारे ना—हरकत प्रमाणपत्र प्राप्त केले आहे काय? | होय | नाही | लागू नाही |
| २१ | सफाईगार पदासाठी अर्ज करण्याकरीता आवश्यक असलेल्या शुल्काचा डिमांड ड्राफ्टची माहिती (मूळ प्रत अर्जासोबत जोडावी) | डिमांड ड्राफ्ट :—<br>क्रमांक :—<br>दिनांक :—<br>शुल्क रूपये:— | | |
| २२ | उमेदवाराविरूद्ध कोणतीही फौजदारी कार्यवाही प्रलंबित आहे का? (असल्यास माहिती जोडावी) | होय/नाही | | |
| २३ | उमेदवारास न्यायालयाने दोषी ठरवले आहे का? (असल्यास माहिती जोडावी) | होय/नाही | | |
| २४ | उमेदवारा विरूद्ध (शासकीय कार्यालयात कार्यरत असल्यास) शिस्तभंगाची चौकशी सुरू आहे का? (असल्यास माहिती जोडावी) | होय | नाही | लागू नाही |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | उमेदवारास विभागीय चौकशीत दोषी ठरवले आहे का? | होय | नाही | लागू नाही |
| २६ | कोणत्याही न्यायालय/ एम.पी.एस.सी/यु.पी.एस.सी. किंवा कोणत्याही राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्याद्वारे आयोजित केलेल्या परीक्षा प्रक्रियेत उपस्थित राहण्यापासून कायमस्वरूपी किंवा काही कालावधीसाठी बाद केले आहे का? | होय/नाही | | |

मी, प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो/करते की, वरील नमूद केलेली माहिती अचूक व खरी दिली असून परिपूर्ण सत्य आहे. वरील माहिती खोटी व चुकीची आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझ्या विरूद्ध कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

दिनांक :

ठिकाण : उमेदवाराची स्वाक्षरी व नाव

# परिशिष्ट 'ब'

## चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/कु............................................ ..........................................हे राहणार.....................तालुका..................... जिल्हा............................रहिवासी असून, मी त्यांना मागील..................वर्षापासून ओळखतो/ओळखते, त्यांची वर्तणूक व चारित्र्य चांगले आहे. ते माझे नातेवाईक नाहीत.

करीता सदरील चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

ठिकाण :

दिनांक :

**प्रमाणपत्र देणा—याची सही, नाव व हुद्दा**

**सही :—**

**नाव :—**

**हुद्दा :—**

**शिक्का / रबरी शिक्का**

(Seeal/Rubber Stamp)

पत्ता :..........................................
..........................................
..........................................

भ्रमणध्वनी क्रमांक ..................

(चारित्र्य (वर्तणूक) प्रमाणपत्रे भरून वैयक्तिक मुलाखतीच्या वेळी सादर करावे.)

# परिशिष्ट 'क'

## प्रतिज्ञापन
## नमुना —"अ"
## (नियम ४ पहा)

मी, श्री/श्रीमती/कु..........................................................................
श्री/श्रीमती ............................................................................यांचा मुलगा/मुलगी/
पती/पत्नी, वय...................वर्ष, राहणार.........................................................
यांद्वारे पुढील प्रमाणे जाहीर करतो/करते की,

१) मी सफाईगार या पदासाठी माझा अर्ज सादर केला आहे.
२) आज रोजी मला.............(संख्या) इतकी हयात मुले आहेत. यापैकी दिनांक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या............आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)
३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असले तर दिंनाक २८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे हया पदासाठी मी अनर्ह ठरविंण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :
दिनांक : **उमेदवाराची स्वाक्षरी व नाव**